# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः28.06.2024** **वारःशुक्रवार**

1.पेपर फुटीप्रकरणी सरकार ठोस उपाययोजना करत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

2.राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार दर्शक प्रस्तावावर दोन्ही सभागृहात होणार आज चर्चा

3.महाराष्ट्र राज्याचा आर्थिक पाहाणी अहवाल विधीमंडळात सादर

4.मन की बात कार्यक्रमाचा 111 वा भाग येत्या रविवारी

आणि

5.टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत उद्या अंतिम सामन्यात भारताची दक्षिण आफ्रिकेशी लढत

**राष्ट्रपती**

देशातल्या जनतेनं या सरकारला तिसऱ्यांदा निवडून देऊन, गेल्या दहा वर्षातल्या सेवा आणि सुशासनावर पसंतीची मोहोर उमटवली आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. अठराव्या लोकसभेच्या स्थापनेनंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्यांनी संबोधित केलं. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकार आपल्या आकांक्षा पूर्ण करेल, असा जनतेला विश्वास वाटतो, असं सांगत; अठरावी लोकसभा अनेक बाबतीत ऐतिहासिक असल्याचं त्या म्हणाल्या. पेपर फुटीप्रकरणी सरकार ठोस उपाययोजना करत आहे, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी केली जाईल, संसदेनं पेपरफुटीसंदर्भात कायदा बनवला आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्या दहा वर्षात भारताच्या अर्थव्यवस्थेनं अकराव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. आपण आता हरित युगाकडे वाटचाल करत आहोत, यासाठी सरकार आवश्यक ती पावलं उचलत आहे. हरित उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढवत
असल्यामुळे रोजगार निर्मितीतही वाढ होईल असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला. येत्या १ जुलैपासून देशात नवे फौजदारी कायदे लागू होणार आहेत, याद्वारे आता दंडाऐवजी न्यायाला प्राधान्य दिलं जाणार आहे, असं त्या म्हणाल्या. राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. काल राज्यसभेचं कामकाज सुरू झालं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांची ओळख करून दिली. त्यानंतर राज्यसभेचं कामकाजही दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.संसदेच्या दोन्ही सभागृहात आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार दर्शक प्रस्तावावर चर्चा सुरू होणार आहे.

**विधिमंडळ**

महाराष्ट्राच्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला कालपासून सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल २०२३-२४ या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल दोन्ही सभागृहांच्या

पटलावर मांडला. गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. २०२२- २३ या आर्थिक वर्षात राज्याच्या स्थूल उत्पादनात ९ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ झाली होती. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ८ पूर्णांक ८ दशांश टक्के, तर कृषी क्षेत्रात सर्वात कमी १ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ गेल्या आर्थिक वर्षात झाली. उद्योग क्षेत्राचा वाढीचा दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील, असं पूर्वानुमान आहे. गेल्या आर्थिक वर्षात राज्याचं सांकेतिक स्थूल उत्पादन ४० लाख ४४ हजार २५१ कोटी रुपये अपेक्षित आहे. त्या आधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्यात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सांकेतिक स्थूल राष्ट्रीय उत्पादनात राज्याचा सरासरी वाटा सर्वाधिक आहे, असं या अहवालात म्हटलं आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ८ दशांश टक्के, महसुली तूट अर्धा टक्के आणि कर्जाचं प्रमाण राज्याच्या उत्पन्नाच्या १७ पूर्णांक ६ दशांश टक्के आहे. गेल्या आर्थिक वर्षात दरडोई राज्य उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे. आधीच्या वर्षाच्या तुलनेत त्यात २५ हजार २१४ रुपयांची वाढ झाली आहे. दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात सहाव्या स्थानी आहे. परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र गेल्या आर्थिक वर्षातही पहिल्या स्थानी राहिला आहे.

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी ११ वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेतील तिसऱ्या आवृत्तीचा हा पहिला भाग असून या कार्यक्रमाचा हा 111 वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसेच यूट्यूब चॅनेलवरून तसंच न्यूज ऑन एआयआर ॲपवर याचं थेट प्रसारण श्रोत्यांना ऐकता येणार आहे. त्यानंतर लगेचच प्रादेशिक भाषेतला अनुवादही प्रसारित होणार आहे.

**<u>हिंदी-भाषा</u>**

हिंदी भाषेच्या प्रचार आणि प्रसाराच्या हेतूनं संयुक्त राष्ट्रांनी सुरू केलेल्या उपक्रमात भारतानं एक मिलियनहून अधिक डॉलर्सचं योगदान दिलं आहे. संयुक्त राष्ट्रातील भारताचे प्रतिनिधी आर. रवींद्र यांनी काल संयुक्त राष्ट्राच्या जागतिक प्रसारण विभागाच्या वृत्त आणि माध्यम विभागाचे संचालक इयान फिलिप्स यांना हिंदी @ UN प्रकल्पाच्या विस्तारासाठी धनादेश सुपूर्द केला. जागतिक संघटनांमध्ये हिंदीचा वापर वाढवण्याच्या उद्देशानं २०१८मध्ये Hindi @ UN प्रकल्पाची सुरुवात झाली होती. या दृष्टीनं संयुक्त राष्ट्राच्यावतीनं आठवड्यातून एकदा एक बातमीपत्र हिंदी भाषेतून प्रसारीत करण्यात येतं. संकेतस्थळ, तसंच एक्स, इंस्टाग्राम, फेसबुक अशा समाजमाध्यमांवरही हिंदी भाषेला चालना देण्यासाठी प्रसार केला जातो

**<u>MSME-दिवस</u>**

जागतिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग अर्थात MSME दिवस काल सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्रिय मंत्री जीतम राम मांझी यांनी काल नवी दिल्ली इथं झालेल्या उद्यमी भारत या कार्यक्रमांत दोन नवीन योजनांची घोषणा केली. MSME टीम आणि यशस्वीनी अशी या योजनांची नावं आहेत. डिजीटल कॉमर्स क्षेत्रात ओपन नेटवर्कसाठी पाच लाख लघुउद्योगांना प्रोत्साहन देणं आणि महिलांच्या

उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी तसंच ग्रामीण आणि मागास भागांत महिलांद्वारे चालवल्या जाणाऱ्या लघुउद्योगांना आवश्यक ती मदत आणि सहकार्य पुरवण्याचा यशस्वीनी योजनेचा उद्देश आहे. केंद्र सरकार MSME क्षेत्रात नव्याने कायद्यात सुधारणा करत आहे, यामुळे देशाच्या विकासातील एक उत्प्रेरक म्हणून हा उद्योग विभाग काम करेल असा विश्वास मांझी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

**अभ्यासडीआरडीओ**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओनं विकसित केलेल्या अत्याधुनिक अभ्यास या स्वदेशी प्रणालीने सलग सहा विकासात्मक चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. या प्रणालीच्या अद्यापपर्यंत १० विकासात्मक परीक्षण चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'अभ्यास'च्या विकासात्मक चाचण्यांसाठी डीआरडीओ, सशस्त्र दल आणि संबंधित उद्योग गटाचं कौतुक केलं आहे.

**नांदेडविमान**

गेल्या अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या नांदेड-पुणे, नांदेड - नागपूर विमानसेवेला कालपासून सुरुवात झाली. सकाळी साडेदहाला नांदेडवरून निघणारे विमान पुण्यात सकाळी साडेअकरा वाजता पोचेल. तर नागपुरसाठी दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी विमान सुटून ते दुपारी दोन वाजता नागपूरला पोहोचेल. यापूर्वी ३१ मार्चपासून नांदेड- बंगळूर, नांदेड- दिल्ली - जालंधर, नांदेड- हैदराबाद, नांदेड - अहमदाबाद ही विमानसेवा सुरू आहे.

**नीट-पेपरफुटी**

वैद्यकीय पदवीपूर्व प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट-युजी परिक्षेतील पेपरफुटी प्रकरणी केंद्रिय अण्वेषण विभाग झारखंडमधील हजारीबाग इथल्या ओयासीस शाळेच्या मुख्याध्यापकांची चौकशी करत आहे. या मुख्याध्यापकांची हजारीबाग शहरासाठीचे नीट परिक्षा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

**मान्सून**

नैऋत्य मोसमी पावसाने उत्तरेकडे वाटचाल सुरू केली आहे. संपूर्ण अरबी समुद्र, राजस्थान, पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, बिहार, जम्मू काश्मीर लडाख, गिलगिट बाल्टिस्तानचा बहुतांश भाग, पंजाब, पूर्व उत्तरप्रदेशच्या काही भागात मान्सूनची आगेकूच झाली आहे. येत्या दोन तीन दिवसांत देशाच्या बहुतांश भागात मान्सून दाखल होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झालं आहे. दरम्यान, दिल्ली आणि आसपासच्या परिसरात काल मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे दिल्ली विमानतळावरील टर्मिनल एक इथं छताचा काही भाग कोसळला असून यात काही जण जखमी झाल्याचं वृत्त आहे.

**निधन**

माजी परराष्ट्र सचिव मुचकुंद दुबे यांचं बुधवारी दिल्लीत निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. दुबे १९५७ मध्ये भारतीय परराष्ट्र सेवेत दाखल झाले होते. बांग्लादेशचे उच्चायुक्त आणि संयुक्त राष्ट्रामध्ये भारताचे स्थायी प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम पाहिलं होतं. युनेस्कोच्या कार्यकारी मंडळाचे भारतीय सदस्य,

बिहारच्या कॉमन सिस्टिम आयोगाचे अध्यक्ष आणि सिक्किमच्या नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. सामाजिक विकास परिषदेचे अध्यक्ष आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठात प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले होतं. विविध विषयांवरील पुस्तकांचं लेखनही त्यांनी केलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

टी२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, उद्या गायना मध्ये भारताचा दक्षिण आफ्रिकेशी अंतिम सामना होणार आहे. काल भारताच्या फिरकी गोलंदाजांच्या भेदक माऱ्याच्या आणि कर्णधार रोहित शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर इंग्लंडला माघारी पाठवत भारतीय संघानं तिसऱ्यांदा अंतिम सामन्यात धडक मारली आहे. पावसामुळं नाणेफेकीला उशीर झाल्यानंतर इंग्लंडनं नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. पहिले दोन गडी झटपट गमावल्यानंतर, पावसाने हजेरी लावली. त्यानंतर मात्र रोहित शर्माच्या ५७ आणि सूर्यकुमार यादवच्या ४७ धावांच्या जोरावर भारतीय संघाने१७१ धावांपर्यंत मजल मारली. गोलंदाजांनी उर्वरीत कामगिरी पार पाडत इंग्लंडला सोळा षटक ४ चेंडूत १०३ धावातच गारद केलं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**